# राम प्रहर

♦ वर्ष १४ ♦ अंक ६४ ♦ मंगळवार, २१ सप्टेंबर २०२१ ♦ रायगड ♦ पाने ६ ♦ किंमत २ रुपये | ♦ Year : 14 ♦ Issue : 64 ♦ Tuesday, 21 September 2021 ♦ Raigad ♦ Page - 6 ♦ Price - 2


# मंत्री मुश्रीफांचा तिसरा घोटाळाही बाहेर काढणार

## भाजप नेते किरीट सोमय्यांचा इशारा



**कराड : प्रतिनिधी**

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्यावर शेकडो कोटींचा भ्रष्टाचार केल्याचे आरोप केले आहेत. मुश्रीफ यांनी केलेल्या घोटाळ्यांचे तब्बल २७०० पानी पुरावेच आपण आयकर विभागाकडे सादर केल्याचे किरीट सोमय्या यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केले होते. मुश्रीफ यांच्या विरोधातला तिसरा घोटाळा लवकरच बाहेर काढणार असल्याचे त्यांनी सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

कायदा व सुव्यवस्थेच्या कारणासाठी कोल्हापूर दौरा रद्द केल्याने संतापलेल्या किरीट सोमय्या यांनी कराड इथे पत्रकार परिषद घेतली आणि आपल्या पुढच्या कामाची दिशा सांगितली. या वेळी लवकरच मुश्रीफ यांचा तिसरा घोटाळा बाहेर काढणार, तसेच या विरोधात ईडीकडे तक्रार करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या वेळी बोलताना ते म्हणाले, हसन मुश्रीप यांचे जावई हे ब्रिक्स इंडिया लिमिटेड या कंपनीचे बेनामी मालक आहेत. ही कंपनी आणि सरसेनापती कारखान्यामध्ये ५० कोटींची आर्थिक उलाढाल झाली आहे. या कंपनीत आलेले पैसे अपारदर्शक पद्धतीने आले आहेत. या व्यवहाराबद्दल काहीही माहिती नाही. एकूण १०० कोटींचा हा घोटाळा आहे.

दरम्यान, मंत्री मुश्रीफ यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करून कराडहून मुंबईत परतल्यावर सोमय्या यांचे कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले. या वेळी सोमय्या यांनी मुंबई महापालिकेवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले. या वेळी महाविकास आघाडीच्या मंत्रिमंडळाचा '४० चोर मंत्रिमंडळ' असा उल्लेख करत आता गंभीर लढाईला सुरुवात झाली असून आम्ही आता या महाराष्ट्राला घोटाळेमुक्त करणार, असा संकल्प सोमय्या यांनी केला.

## काँग्रेसच्या दोन मंत्र्यांचीही नावे समोर येतील -चंद्रकांत पाटील



**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या विरोधात भाजप नेते किरीट सोमय्या यांनी घोटाळ्याचे आरोप केले असतानाच येत्या दोन दिवसांत काँग्रेसच्या दोन नेत्यांचेही विषय बाहेर येणार असल्याचा इशारा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिला आहे.

पाटील यांनी मंत्री हसन मुश्रीफ यांनी केलेल्या दाव्यावरही खुलासा केला आहे. ते म्हणाले की, मुश्रीफांना मी अशी कोणतीही ऑफर दिली नव्हती. त्यांनी ड्रामा करणे बंद करावे, असे पाटील यांनी स्पष्टपणे सांगितले.

किरीट सोमय्यावर केलेल्या कारवाईवरूनही त्यांनी कायद्याची लढाई कायद्याने लढा, असे म्हणत मुश्रीफांवर निशाणा साधला आहे.

पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना पाटील यांनी एकप्रकारे गौप्यस्फोटच केला आहे. अनेकांना असे वाटतेय की राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे आमदार सापडताहेत, पण दोन काँग्रेसचीही नावे आली आहेत. येत्या दोन दिवसांत त्यांचीही नावे समोर येतील, असे म्हणत चंद्रकांत पाटील यांनी काँग्रेसला इशाराच दिला आहे.


भाजपच्या रडारवर अन्याय आहे, भ्रष्टाचार आहे, महिलांना त्रास देणारे आहेत, त्यात योगायोगाने जावई आहेत, त्याला आम्ही काय करणार.

## शिवसेनेने हात झटकले

**मुंबई :** राष्ट्रवादीने किरीट सोमय्यांना रोखून धरण्याचा प्रयत्न केला. यावरून भाजपने चांगलेच रान उठवले, मात्र यात शिवसेना बदनाम होत असल्याचे पाहून शिवसेनेने या पोलिसी कारवाईत आमचा काहीही हात नसल्याचे सांगत हात वर केले आहेत आणि सर्व जबाबदारी राष्ट्रवादीवर फोडून मोकळे झाले आहेत. यावरून मविआ सरकारमध्ये विशेषतः शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये आलबेल नसल्याचे चित्र समोर येत आहे.

किरीट सोमय्यांनी कराडच्या दौऱ्याची आखणी केली तेव्हा लगेचच राष्ट्रवादीकडे असलेल्या गृहमंत्रालयाने कारवाईस सुरुवात केली. या सगळ्या प्रकरणात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे संशयाची सुई गेली आणि भाजपने मुख्यमंत्र्यांना टार्गेट करण्यास सुरुवात केली. हे पाहून लगेचच शिवसेनेने स्पष्टीकरण देण्यास सुरुवात केली.

शिवसेनेच्या एका वरिष्ठ नेत्याने व खासदार संजय राऊत यांनीही गृहमंत्रालयाने कारवाई केली असून मुख्यमंत्र्यांचा संबंध नसल्याचे स्पष्ट केले.



**देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच असे झाले असेल की, एक व्यक्ती भ्रष्टाचाराविरोधात पोलिसांत तक्रार दाखल करायला जातो आणि पोलीस त्याला अडवतात, पण भाजप काही थांबणार नाही. सातत्याने भ्रष्टाचाराविरोधातील लढाई भाजप लढत राहील. असे असू शकते की मुख्यमंत्र्यांना माहीत नसेल ही कारवाई. थेट गृहमंत्र्यांनी केली असेल, पण मुख्यमंत्र्यांना कळाल्यानंतर त्यांनी दखल घेऊन अशी कारवाई थांबवली पाहिजे.**

**–देवेंद्र फडणवीस,** विरोधी पक्षनेते

(छाया : भारत चोगले)



## महाविकास आघाडी ही सरकारसाठीची तडजोड

### ■ माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांचे वक्तव्य

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी ही आघाडी सरकार स्थापन करण्यासाठी केलेली तडजोड आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या दोन काँग्रेस एकत्र येऊ शकत नाहीत, तर शिवसेना काँग्रेसी विचाराची कशी होऊ शकते? त्यामुळे सर्व स्थानिक स्वराज्य समित्यांच्या निवडणुका शिवसेना स्वबळावर लढणार असल्याचे वक्तव्य माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी रागवलीत केले.

राष्ट्रवादीचे माजी जि. प. सदस्य अविनाश कोळंबेकर यांनी गीतेंच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमात शिवसेनेने राष्ट्रवादीवर सडकून टीका केली.

गीते म्हणाले, राज्यात आपले सरकार आहे. आपले कशासाठी तर मुख्यमंत्री आपले आहेत. सरकार आघाडी सांभाळेल आपली जबाबदारी आपले गाव सांभाळायची आहे. गाव सांभाळताना फक्त शिवसेनेचा विचार करायचाय. राष्ट्रवादीचा जन्मच काँग्रेसच्या पाठीत खंजीर खुपसून झालाय. आमचा एकच नेता शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे बाकी किती कोण कोणाला जाणता राजा म्हणत असू दे, आमचा दुसरा नेता होऊच शकत नाही. सत्तेसाठी तडजोड केलेली आहे. आघाडी ज्या दिवशी तुटेल तेव्हा तुटेल, माझा शाप नाही आघाडी तुटू दे, पण जेव्हा आघाडी तुटेल **(पान २ वर..)**

### पालकमंत्री सूडबुद्धीने वागतात –आमदार महेंद्र थोरवे

अविनाशजी आपण शिवसैनिक होतात, पण राष्ट्रवादी पक्ष हा रायगडला लागलेला शाप आहे. इथे भूलभुलय्या करणाऱ्यांची कमी नाही. पालकमंत्री सूडबुद्धीने वागत आहेत. शिवसैनिकांवर अन्याय होत आहे. त्याचे अतिशय दुःख होत आहे. आघाडीचा धर्म कुठेही पाळत नाहीत. ही आघाडी आम्हाला मान्य नाही, असे आमदार महेंद्र थोरवे या वेळी म्हणाले.

## निवडक

### चरणजित सिंग चन्नी पंजाबचे नवे मुख्यमंत्री

**चंदीगढ :** पंजाबच्या राजकारणात सातत्याने धुसफूस चालू असल्याची परिणती मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांनी दिलेल्या राजीनाम्यात झाली. त्यानंतर अनेक नेत्यांना डावलून काँग्रेसकडून दलित नेते चरणजीत सिंह चन्नी यांना मुख्यमंत्री पदाची संधी देण्यात आली आहे. चन्नी यांनी सोमवारी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

### अफगाणिस्तानमध्ये आयपीएलच्या प्रसारणावर तालिबानकडून बंदी

**काबूल :** आयपीएलच्या दुसऱ्या सत्रातील लढती अफगाणिस्तानमध्ये पाहता येणार नाहीत. तालिबानींनी म्हटले की, आयपीएलचा कन्टेंट इस्लामविरोधी आहे. सामना सुरू असताना चियर लीडर्स केस मोकळे सोडून डान्स करतात आणि हे इस्लामिक संस्कृतीच्या विरोधात आहे. तालिबानच्या नव्या कायद्यात महिलांना केस मोकळे सोडण्याची परवानगी नाही.

## शिवसेनेतील मतभेद चव्हाट्यावर

### मंत्री शिंदेंच्या हस्ते झालेल्या नियुक्त्या सरनाईकांकडून रद्द



**मीरा रोड : प्रतिनिधी**

महापालिकेची निवडणूक पुढील वर्षी असताना शिवसेनेतील पद नियुक्त्यांवरून सध्या ईडीच्या फेऱ्यात अडकलेले आमदार प्रताप सरनाईक व मीरा भाईंदर जिल्हाप्रमुख आणि जिल्हा संघटक यांच्यातील मतभेद सरनाईक यांच्या व्हायरल पत्रप्रपंचामुळे चव्हाट्यावर आले आहेत. पालकमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आलेली पदे सरनाईक यांनी संपर्कप्रमुख नात्याने रद्दबातल ठरवली आहेत, तर जिल्हाप्रमुख व जिल्हा संघटक यांनी संदेश जारी करत शिंदेंच्या आदेशाचा उल्लेख करून त्या नियुक्त्या ग्राह्य असल्याचे स्पष्ट केले आहे.

ईडीच्या फेऱ्यात सरनाईक अडकले असतानाच दुसरीकडे जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे व जिल्हा संघटक स्नेहल सावंत यांनी पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते अनेकांना शिवसेनेची पदे नियुक्तीची पत्रे वाटप केली आहेत. पदांच्या नियुक्तीवरून सरनाईक व त्यांचे समर्थक नाराज आहेत. सरनाईक यांनी तर म्हात्रे व सावंत यांना पत्र लिहून त्याच्या प्रती पक्षनेत्यांना पाठवल्या आहेत. त्या पत्रांच्या पोच केलेल्या प्रती या सध्या समाजमाध्यमातून व्हायरल झाल्या आहेत. त्यामुळे शिवसेनेत असलेले अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत.

पक्षप्रमुख व वरिष्ठ नेत्यांना न कळवता स्वतःच्या लेटरहेडचा बेकायदेशीर वापर करून परस्पर नियुक्त्या केल्या आहेत. त्या शिस्तीत न बसणाऱ्या बेकायदेशीर असल्याने संपर्क प्रमुख म्हणून त्या नियुक्त्या रद्द करत आहे, असे सरनाईकांनी पत्रात म्हटले आहे.

## तीन दिवस वादळी पावसाची शक्यता

**मुंबई :** राज्यात पुढील तीन दिवस सर्वत्र वादळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. प्रामुख्याने कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात सर्वत्र जोरदार पावसाचा अंदाज आहे.

कोकणात वादळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. कोकणाला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, वाऱ्याचा वेगदेखील अधिक राहण्याचा अंदाज आहे.

घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार पाऊस असला, तरी पुणे शहरात हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. दरम्यान, राज्यात २४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर दरम्यान देखील सर्वत्र पाऊस बघायला मिळू शकतो.

## अभीष्टचिंतन



**डोंबिवली : रायगड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम उपस्थित होते.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सेक्टर १७ येथील सिद्धिविनायक ट्रस्ट मंदिर परिसरात रविवारी वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, भाजप उलवे नोड-२चे उपाध्यक्ष अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, भाऊ भोईर, किशोर पाटील, विघ्नेश घरत, राज घरत आदी उपस्थित होते.**

## पुढच्या वर्षी लवकर या!

### रायगडात १० दिवसांच्या बाप्पांना भावपूर्ण निरोप

**अलिबाग, पनवेल : प्रतिनिधी**

लाडक्या गणरायाला १० दिवसांच्या पाहुणचारानंतर अनंत चतुर्दशीच्या दिवशी भाविकांनी भावपूर्ण निरोप दिला. रायगडातील समुद्रकिनारे, नदी, तलाव अशा विसर्जन घाटांवर कोरोना काळातही भक्तिमय वातावरणात रविवारी (दि. १९) बाप्पाचे विसर्जन करण्यात आले.

जिल्ह्यातील सार्वजनिक १६० व खाजगी १७ हजार ९१५ असे एकूण १८ हजार ७५ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अलिबागसह अन्य ठिकाणी निर्माल्य संकलन व्यवस्था करण्यात आली होती. जिल्हा प्रशासनाबरोबरच पोलीस यंत्रणा, विविध स्वयंसेवी संस्था विसर्जन सुरळीत पार पाडण्यासाठी सज्ज होते.

ग्रामीण भागातील गणेशमूर्ती समूहाने डोक्यावर वाहून विसर्जनस्थळी नेण्यात येत होत्या. तर शहरी भागात गणेशमूर्ती नेण्यासाठी वाहनांचा वापर केला जात होता. यंदाही कोरोनामुळे विसर्जन मिरवणुका काढण्यास बंदी होती, मात्र टाळमृदंगाच्या साथीने पारंपरिक भजन गात भक्तगण आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देत होते.



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात एकूण चार हजार ६०३ गणपतींचे विसर्जन करण्यात आले. विसर्जन स्थळांवर पालिकेच्या वतीने **(पान २ वर..)**

## राम प्रहर दिवाळी अंकासाठी आवाहन

दरवर्षी दिवाळी अंकात नावीन्यपूर्ण विषय हाताळून वाचकांना वैचारिक फराळाची मेजवानी देणाऱ्या दै. राम प्रहरने यंदा समाजातील लक्षणीय बदलांवर 'स्थित्यंतर' हा दिवाळी अंक प्रसिद्ध करण्याचे योजिले आहे. या अंकात आरोग्य, शिक्षण, धर्मकार्य, गाव, शहर, समाज, बाजारपेठ, कोरोना काळ, डॉक्टरी, वकिली व पत्रकारिता पेशा यासह (राजकारण वगळता) इतर क्षेत्रातील बदलांचा समावेश असणार आहे. आपल्या निरीक्षणातून टिपलेल्या बदलांबाबत अभ्यासपूर्ण लेख अपेक्षित आहे. त्याचबरोबर नेहमीप्रमाणे कथा, कविता, चारोळ्या, व्यंगचित्र आदी साहित्यही असणार आहे. आपला मजकूर मंगळवार, ५ ऑक्टोबर २०२१पर्यंत ramprahar@gmail.com या मेलवर टाईप करून पाठवावा. साहित्य निवडण्याचे अधिकार संपादकीय मंडळाला असतील. अधिक माहितीसाठी ७७३८१०६००९ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा.

**–मुख्य संपादक**

# ‘त्या’ घटनेची उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांकडून चौकशी करा

## भाजप नेते आमदार अॅड. आशिष शेलार यांची मागणी



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात ‘तक्रारदार स्थानबद्ध आणि गावगुंड राज्यभर मुक्त’ अशी स्थिती निर्माण झाली असून राज्य अराजकतेकडे जात आहे. त्यामुळे पत्रकार, संपादक, बुद्धिजीवी वर्ग, सामान्य नागरिकांनी आता बोलले पाहिजे. विरोधी पक्ष म्हणून आम्ही आमचे काम करीत आहोतच, असे सांगत भाजप नेते आमदार अॅड. आशिष शेलार यांनी आज भाजप प्रदेश कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत किरीट सोमय्या यांना ज्या पद्धतीने स्थानबद्ध करण्याबाबत घटना घडली, त्या एकूण सगळ्या घटनेची मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी करा, अशी मागणी सरकारकडे त्यांनी केली.

कोल्हापूर जिल्ह्यात मुश्रीफ यांच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी भाजप नेते किरीट सोमय्या हे जात होते. त्या वेळी सोमय्या यांना कोल्हापूरला जाण्यापासून पोलिसांकडून रोखण्यात आले. किरीट सोमय्या यांनी आधीच सांगितले की, आपण अमूक एका ठिकाणी तक्रार नोंदवण्यासाठी जाणार आहे. त्या वेळी काल मुंबईत शंभर सव्वाशे पोलीस नीलम नगरला घेराव घालून होते. हा पोलिसांचा गैरवावर नाही का, असा सवालही शेलारांनी केलाय. नोटीस म्हणून जी दाखवली जात होती, ती चुकीची आणि बोगस होती. इतकी गंभीर गोष्ट आहे की एका नागरिकाला, एका नेत्याला, एका माजी खासदाराला खोटी आणि बोगस नोटीस दाखवली जाते. ज्या जिल्ह्यातून ही नोटीस काढली असे सांगितले जाते त्या पोलिसांनी मुंबईतील लोकल पोलिसांकडे एन्ट्री केली होती का? सोमय्यांना नोटीस दाखवण्याची पद्धत आणि खऱ्या नोटीसला उशीर का झाला? अशी प्रश्नांची सरबत्तीच शेलार यांनी या वेळी केली.

याप्रकरणी मुख्यमंत्री कार्यालयातून सांगितले जाते की, याबाबत आपल्याला कोणतीही माहिती नाही. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य अधिकच वाढते. पोलीस ठाण्यात तक्रार करायला जाण्यास रोखणे, त्यासाठी जे कारण दिले तेही संशयास्पद आहे. गुन्हेगार कोण हे माहिती आहे. कायदा आणि सुव्यवस्था कोण हाती घेईल हे माहिती आहे, तो कुठल्या पक्षाचा हेही माहिती आणि मग कारवाई कुणावर आणि अटकाव कुणाला करताय? एकप्रकारे सरकारी यंत्रणेने गुन्हा केला आहे. काही बातम्या समोर आल्या त्यात शिवसेनेचे नेते म्हणतात की, मुख्यमंत्र्यांना अवगत केले गेले नव्हते. त्यामुळे हे प्रकरण गंभीर आहे. या संपूर्ण प्रकरणाची मुख्यमंत्र्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या माध्यमातून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आज शेलार यांनी भाजपच्या वतीने केली आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांत असेच दुर्दैवी चित्र आहे. समाज माध्यमांवर जे बोलले त्यांना मारण्यात आले, एका निवृत्त नेव्ही अधिकाऱ्याचा डोळा फोडण्यात आला, सरकार विरोधात बोलले म्हणून एका संपादकांना घरात घुसून अटक करण्यात आली, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे बोलणे दखलपात्र गुन्हा करून त्यांना अटक करण्यात आली, दहशतवादी कारवाया राज्यात होतात त्याची माहिती पोलिसांकडे नाही. हे सर्व पाहिले की, राज्य अराजकतेकडे जाते आहे. अराजकता राज्यकर्ते माजवत आहेत. तर दुसरीकडे कायदेशीर मार्गाने तक्रार करणाऱ्या नागरिकांना अटकाव केला जातोय, किरीट सोमय्या यांना पोलीस ठाण्यात जाण्यात अटकाव करण्यात आला, तसेच करुणा शर्मा या पोलीस ठाण्यात जात असताना त्यांना रोखण्यासाठी खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आले, ट्विटरवर लखोबा लोखंडे नावाने ट्विटर खाते चालवणाऱ्याला अटक करून न्यायालयात आणल्यानंतर शिवसैनिकांनी बेदम मारहाण केल्याची घटना पुण्यात घडली हे पाहता राज्यातील जनता असहाय्य झाल्याचे चित्र आहे. राज्यकर्ते अराजकता माजवत आहेत आणि जनता असहाय्य आहे, न्याय कुणाकडे मागावा, अशी स्थिती जनतेची आहे. राज्य अराजकतेकडे जाते आहे. त्यामुळे पत्रकार, संपादक, बुद्धिजीवी वर्ग, सामान्य नागरिकांनी आता बोलले पाहिजे, असे आवाहन आमदार अॅड. आशिष शेलार यांनी केले.

मुख्यमंत्री कोरोना काळात म्हणत होते की मी जबाबदार, पण आता मुख्यमंत्र्यांना गोष्टी माहिती नसल्याचे शिवसेनेचे नेते सांगतात. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी आता मी बेजबाबदार अशी घोषणा द्यावी, असा खोचक टोलाही शेलार यांनी लगावला आहे.

# मोदी यांच्या जीवनावरील प्रदर्शनी म्हणजे लोकशाहीची विकासगाथा

## भाजप युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभिनव प्रकाश यांचे प्रतिपादन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवा व समर्पण अभियानांतर्गत जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेता व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील प्रदर्शनीचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. या प्रदर्शनीला भाजप युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभिनव प्रकाश यांनी रविवारी (दि. १९) भेट दिली. या वेळी त्यांनी ही प्रदर्शनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जीवनी नसून देशाच्या लोकशाहीची विकासगाथा असल्याचे मत व्यक्त केले.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या सूचनेनुसार १७ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर २०२१ या काळात सेवा व समर्पण अभियान विविध कार्यक्रमांद्वारे साजरे होणार आहे. त्यानुसार जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेता व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. त्या अनुषंगाने उत्तर रायगड जिल्हा आणि पनवेल भाजपच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्त्व व जीवनावरील आधारित तीन दिवसीय प्रदर्शनीचे ओरियन मॉलमध्ये आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनीला भाजप युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभिनव प्रकाश, कार्यकारिणी सदस्य अरविंद दमानी आणि प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांनी भेट दिली. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास महाराष्ट्रभरात आपल्या व्याख्यानातून पोहचवणाच्या विवेक परशुराम भोपी यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, कामोठे शहर युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, युवा नेते हॅप्पी सिंग, सरचिटणीस दिनेश खानावकर, चिन्मय समेळ, जमीर शेख, सचिव अॅड. ऋषिकेश जोशी, निखिल चव्हाण, सहसंयोजक नूतन पाटील, सुनील राणा, प्रशांत कदम, परेश पाटील, मिहीर देसाई, तेजस जाधव, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, देवांशु प्रबाळे, चंद्रकांत मंजुळे, आकाश भाटी, अजिंक्य भेटे, सतीश पाटील, किरण जाधव, नवनाथ भोसले, अमित जावरे, प्रवीण कोरडे, ओमकार पाटील, स्वप्नील मुकादम आदींसह युवा मोर्चाचे पदाधिकारी, कर्यकर्ते उपस्थित होते.

# जेएनपीटीमध्ये ड्वार्फ कंटेनर ट्रेनला हिरवा झेंडा

**उरण : वार्ताहर**

केंद्रीय बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी जेएनपीटी येथे ड्वार्फ कंटेनर ट्रेनला आभासी पद्धतीने हिरवा झेंडा दाखवून ड्वार्फ (कमी उंचीचे) कंटेनर ट्रेन सेवेचा आरंभ केला. या वेळी नौकायन व जलमार्ग मंत्रालय (बंदरे) सचिव डॉ. संजीव रंजन, जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेश शरद वाघ उपस्थित होते. मंत्री महोदयांनी हिरवा झेंडा दाखविल्यानंतर बंदरातील ड्वार्फ कंटेनर डेपो (डीसीडी) मधून ड्वार्फ कंटेनरची पहिली खेप ड्वार्फ कंटेनर ट्रेनद्वारा आयसीडी कानपूरला रवाना झाली.

केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल म्हणाले, ड्वार्फ कंटेनर हे पोर्ट-फ्रेंडली असून आणि ते किफायतशीर किंमतीत भारतात तयार केले जाऊ शकतात ज्यामुळे ‘मेक इन इंडिया’ अंतर्गत नवीन संधी खुल्या होतील. या सेवेमुळे मालाची निर्यात अधिक स्पर्धात्मक दराने होईल आणि भारतातून निर्यातीमध्ये वाढ होईल. एक सशक्त लॉजिस्टिक क्षेत्र विकसित झाल्यास उत्पादन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण देश बनण्याचे भारताचे स्वप्न पूर्ण होईल, तसेच मेक इन इंडियाला सुद्धा प्रोत्साहन मिळू शकेल.

जेएनपीटी बंदरात ही सेवा सुरू झाल्याने जेएनपीटीमध्ये व्यवसाय वृद्धी होण्यास, प्रवेशद्वार व रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास देखील मदत होणार आहे.



**उरण : रविवारी गणरायाचे विसर्जन करण्यात आले. उरण नगर परिषदेने विसर्जनाची चोख व्यवस्था केली होती. या वेळी विमला तलाव येथे आमदार महेश बालदी, नगराध्यक्ष सायली म्हात्रे, भाजप तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, जान्हवी पंडित, मुख्याधिकारी संतोष माळी आदी उपस्थित होते.**







**पनवेल : कर्नाळा विभागातील टॅक्सी चालकमालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर आणि भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे यांची सोमवारी सदिच्छा भेट घेतली. या वेळी वंदे मातरम संघटनेचे उपाध्यक्ष रवी नाईक, उमेश पाटील यांच्यासह चालकमालक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.**



**पनवेल : दहा दिवसांपूर्वी वाजतगाजत घरोघरी विराजमान झालेल्या बाप्पाला रविवारी भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. पनवेलमध्ये कोळीवाडा येथील गाढी नदी, बल्लाळेश्वर मंदिर येथील तलाव, तसेच इतर ठिकाणी कोरोना नियमांचे पालन करत गणरायाच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. या वेळी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी विसर्जन व्यवस्थेची पाहणी केली.**

## पान १ वरून

### महाविकास आघाडी ही सरकारसाठीची तडजोड

तेव्हा आपण आपल्याच घरी जाणार शिवसेनेतच जाणार, असे सूचक वक्तव्य या वेळी शिवसेनेचे नेते अनंत गीते यांनी केले. तटकरेंनी लक्षात ठेवावे तुमच्यासाठी मैदान कधीच मोकळे होणार नाही. त्यांनी सातबाऱ्यावर अतिक्रमण केले आहे. त्यांचे अतिक्रमण उतरवायचे आहे. श्रीवर्धन मतदारसंघ कोणालाही आंदण दिलेला नाही, असे वक्तव्य अनंत गीते यांनी केले.

पक्ष प्रवेशकर्ते अविनाश कोळंबेकर म्हणाले की, राष्ट्रवादीत साडेतीन वर्षात दिलेल्या कामचा एकही प्रस्ताव मंजूर केला नाही. प्रशासकीय मान्यता आणायला सुतारवाडीला आणायला जावे लागते, वर्कऑर्डरचा मात्र पत्ता नाही. अशी परिस्थिती राष्ट्रवादीत आहे, तसेच कोळंबेकर यांनी या वेळी राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष दर्शन विचारे यांच्यावरही घणाघात केला. या कार्यक्रमात शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख सदानंद थरवळ, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेंद्र दळवी आदी उपस्थित होते.

### पुढच्या वर्षी लवकर या!

चोख व्यवस्था करण्यात आली होती. पनवेल महापालिका क्षेत्रात एकूण ६७ ठिकाणी गणेश विसर्जनाची सोय करण्यात आली होती. यामध्ये कृत्रिम तलाव, जनरेटर, विद्युत व्यवस्था, मंडप, बॅरिगेटिंग, गणेशमूर्तीची नोंदणी, लाऊडस्पीकर, सॅनिटायजेशन, हॅन्डवॉश, पुष्पमाळा, फुले, दुर्वा, तुळस टाकण्यासाठी निर्माल्य कलशाची सोय करण्यात आली होती. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी घेण्यात आली होती. विसर्जन घाटांवर अग्निशमन दल, वाहतूक, बांधकाम, विद्युत तसेच पोलीस विभागाच्या वतीने चोख बंदोबस्त करण्यात आला होता.

महापालिकेने केलेल्या ऑनलाइन टाईम स्लॉट बुकिंग प्रणालीला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पनवेल महापालिका हद्दीत प्रभागनिहाय गणेशमूर्ती विसर्जन करण्यात आल्या. यामध्ये खारघर १६८८, कळंबोली १६७४, कामोठे ७४३, पनवेल ४९८ एवढ्या गणपतींचे विसर्जन करण्यात आले.



**उरण : अभिषेख जैन यांच्या घरी विराजमान गणरायाचे नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांच्यासह देवेंद्र घरत, अभिषेक जैन कनैया आदींनी विसर्जनापूर्वी दर्शन घेतले.**




**भाजप चिरनेर पंचायत गण अध्यक्ष प्रशांत रमेश ठाकूर यांच्या घरचा बाप्पा.**



**पनवेल : भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी गणेश विसर्जनापूर्वी परिसरातील बाप्पाचे दर्शन घेतले.**



**अशोक अंबेकर, पनवेल**


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. २१ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. तळोजा शाळा, तळोजा गाव
१२. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
१३. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१५. श्री. गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
१६. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१७. आगरी शाळा, खांदा कॉलनी
१८. सुधागड कॉलेज, कळंबोली
१९. न्यु इंग्लिश स्कूल, कळंबोली
२०. दत्तुशेठ पाटील हायस्कूल, कामोठे
२१. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

पनवेल ग्रामीण लसीकरण

१. आसूडगाव, रा.जि.प. शाळा
२. रोडपाली, रा.जि.प. शाळा
३. ओवे कॅम्प, रा.जि.प. शाळा
४. पापडीचा पाडा, रा.जि.प. शाळा
५. रांजणपाडा, रा.जि.प. शाळा
६. धरणा कॅम्प, रा.जि.प. शाळा
७. इनामपुरी, रा.जि.प. शाळा
८. पिसार्वे, रा.जि.प. शाळा
९. फरशीपाडा, रा.जि.प. शाळा
१०. धामोळे, रा.जि.प. शाळा

निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता १५० व दुसऱ्या डोसकरिता ५० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी. (वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)

# गणपती विसर्जनस्थळी स्वच्छता मोहीम

## ■ पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त खारघरमध्ये उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या काळात भारतीय जनता पक्षातर्फे राज्यात सेवा व समर्पण अभियान राबविण्यात येत आहे. यानिमित्त पनवेलमध्येही विविध सेवा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार भाजप खारघर मंडलच्या वतीने गणपती विसर्जन तलाव परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

खारघर सेक्टर १५ येथे सोमवारी (दि. २०) येथील गणपती विसर्जन तलावाजवळील परिसरात पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह अभियानांतर्गत भारतीय जनता पक्ष, दक्षिण भारतीय सेल खारघर मंडलच्या वतीने गणपती विसर्जन घाटाजवळ कचरा स्वच्छ करण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सेवा देताना खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक निलेश बाविस्कर, दक्षिण भारतीय सेल संयोजक रोहन शेट्टी, सह-संयोजक रामकृष्णन, पर्यावरण कार्यक्रम प्रमुख योगिंद्रम कोट्टारी, मनोहर नक्का, प्रभाकर चिदुराला, एन सेंथिल मुरुगन, पेरुमाला, चेल्लाप्पा दास व रहिवासी उपस्थित होते.






पंतप्रधान मोदी सदैव गरीब, वंचित, दलित, आदिवासी, मागास आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी समर्पित आहेत. अनेक दशकांनंतर समाजातील उपेक्षित घटकांचा आवाज मोदी सरकारकडून ऐकला जात असून जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सरकार सज्ज आहे. नरेंद्र मोदी गुजराजचे मुख्यमंत्री व देशाचे पंतप्रधान म्हणून ७ ऑक्टोबर २०२१ ला जनतेच्या आशीर्वादाने जनसेवक म्हणून २० वर्ष पूर्ण करत आहेत. ७ ऑक्टोबर २००१ ला गुजरातचे मुख्यमंत्री व २०१४ रोजी जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही असलेल्या देशाचे पंतप्रधान झाले. लोकशाहीत लोकनेता ही संधी फार कमी नेत्यांना मिळत असून पंतप्रधान मोदी यांची निरंतर वाढणारी लोकप्रियता हे दर्शवत आहे. या वर्षी पंतप्रधान मोदी यांचा जनसेवक म्हणून २० वर्षे कार्यकाळ पूर्ण झाल्याचा सुखद योगायोग व आनंदी क्षण देशभर मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. सेवा व समर्पण अभियानांतर्गत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत.

# पनवेल महापालिका हद्दीत कोरोनामुक्तीचे प्रमाण वाढले

**पनवेल : वार्ताहर**

कोरोनाची दुसरी लाट थोपविण्यात पनवेल महानगरपालिकेला यश आले आहे. पालिका क्षेत्रात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.३२ टक्क्यांवर पोहचले आहेत. महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर व आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेला कोरोनावर नियंत्रण मिळविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. सध्याच्या घडीला पालिका क्षेत्रातील पॉझिटिव्हीटी रेटदेखील नियंत्रणात आल्याने रुग्ण वाढीला ब्रेक लागला आहे.

**लसीकरणही वेगात सुरू**

***कोविडची साथ नियंत्रणात आणण्यासाठी जास्तीत जास्त लसीकरण हे धोरण पनवेल पालिकेने अवलंबले असून सध्याच्या घडीला दररोज १५ हजार नागरिकांचे लसीकरण केले जात आहे. पालिका क्षेत्रात सहा लाख नागरिकांचे लसीकरण पालिकेमार्फत पूर्ण झाले आहे.***

सध्याच्या घडीला पालिका क्षेत्रात ६४ हजार ४३२ रुग्ण कोविडवर मात करून पूर्णपणे बरे झाले आहेत. एकेकाळी पालिका क्षेत्रात सक्रिय रुग्णांचा आकडा हजारोंच्या संख्येने होता. त्याच्यावर पालिकेला नियंत्रण मिळविण्यास यश आले असून केवळ ४४४ सक्रिय रुग्ण आहेत. कोरोनाच्या पहिल्या लाटेतदेखील पनवेल मनपाने उत्कृष्ट कामगिरी केली होती. वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही महापौर व आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय जाणीवपूर्वक परिस्थिती हाताळली. दुसरी लाट थोपविण्यात पालिकेला यश आले असले तरी पालिकेने संभाव्य तिसऱ्या लाटेची सर्वतोपरी तयारी केली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे कळंबोलीत ६५० बेड्चे जम्बो कोविड केअर सेंटर सिडकोच्या मदतीने तयार झाले आहे. त्यामुळे भविष्यात तिसरी लाट आली तरी पालिका प्रशासन तयार असल्याचे आयुक्तांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. खाजगी कोविड रुग्णालयांनाही पालिकेतर्फे सूचना करण्यात आल्या आहेत.

> **दुसरी लाट नियंत्रणात आली असली तरी संभाव्य तिसऱ्या लाटेची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. पालिका प्रशासन त्याकरिता सज्ज असले तरी तिसरी लाट थोपविणे नागरिकांच्याही हातात आहे. कोविडच्या नियमांचे तंतोतंत पालन केल्यास कोरोनावर नियंत्रण मिळविण्यास यश येईल.**
>
> **–गणेश देशमुख, आयुक्त, महापालिका, पनवेल**

# ब्राह्मण सभेतर्फे सामुदायिक अथर्वशीर्ष पठण

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलच्या ब्राह्मण सभा या संस्थेच्या वतीने गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामुदायिक श्रीगणेश अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम झाला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गतवर्षाप्रमाणे यंदाही हा कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने झाला.

पनवेल परिसरातील गणेशभक्तांनी आपापल्या घरातूनच या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सभेच्या अध्यक्ष दीपाली जोशी, सचिव मंजुषा भावे, प्रसाद जोशी यानी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. खजिनदार वैशाली सरदेशपांडे यानी तंत्रसहाय्य केले.

ब्राह्मण सभेच्या वतीने प्रतिवर्षी सामुदायिक अथर्वशीर्षपठणाचा उपक्रम करण्यात येतो. त्याला नवीन पनवेल परिसरातील गणेशभक्तांचा उत्तम प्रतिसाद मिळतो, तसेच विविध सभासदांच्या घरी आवर्तने, संगीत आरती, मंत्रपुष्प आदी कार्यक्रमही होतात.



**पनवेल : जि. प. सदस्य अमित जाधव यांच्या पुढाकाराने पाली देवद ग्रामपंचायतीच्या वतीने सुकापूर येथील लक्ष्मी पब्लिक स्कूल या ठिकाणी नागरिकांचे कोविड लसीकरण करण्यात येत आहे. नेरे आरोग्य केंद्राच्या सहकार्याने सुरू असलेल्या या आरोग्यदायी उपक्रमात सोमवारी ३२१ जणांना लस देण्यात आली. या वेळी जि. प. सदस्य रेश्मा शेळके व शेखर शेळके यांची उपस्थिती होती. त्यांचे जि. प. सदस्य अमित जाधव, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील व सौ. पाटील यांनी स्वागत केले.**

# चिरनेरमध्ये गुरांचा वाडा कोसळून चाऱ्याचे नुकसान

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील कृष्णा आनंत म्हात्रे यांचा गुरांचा वाडा नुकताच पावसाबरोबर कोसळला. या वेळी गोठ्यात बांधलेली एक म्हैस आणि तिचे रेडकू थोडक्यात बचावले असून यात बांधलेल्या जनावरांची कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र गोठ्यातील गुरांसाठी भरलेला १००० पेंढा संपूर्ण भिजून गेला असून गुरांच्या चाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



जळण्यासाठी भरलेल्या फाट्याही भिजल्या. याशिवाय कौले, वासे व वाड्याच्या इतर लाकडी साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून चिरनेर सजाचे तलाठी यांच्या सांगण्यावरून कोतवाल नथुराम कातकरी यांनी कोसळल्या वाड्याची पाहणी करून पंचनामा करून तहसील कार्यालयाकडे पाठविला आहे. या कोसळलेल्या वाड्याची नुकसानभरपाई कृष्णा म्हात्रे यांना मिळावी यासाठी त्यांच्या कुटुंबीयांकडून तहसील कार्यालयाकडे मागणी करण्यात आली आहे.

# पुढच्या वर्षी लवकर या!



भाजप पिरकोन बूथ अध्यक्ष नरेंद्र गावंड



अभिनाथ म्हात्रे, भोकरपाडा, पनवेल



भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते धनजंय पाटील, वशेणी, उरण



मधुकर गावंड, आवरे, उरण



भाजप पिरकोन गाव सचिव नितीन गावंड



नरेश गणेश गावंड मु. पो. आवरे तालुका, उरण



**उरण : आमदार महेश बालदी संस्थापक असलेल्या स्वामी विवेकानंद चौक येथील श्री गणेशोत्सव मंडळाचा राजा.**



**तळोजा : गणेशोत्सवानिमित्त भाजप खारघर मंडल उपाध्यक्ष निर्दोष केणी यांनी तळोजा फेज १मध्ये पर्यावरणपूरक (इको-फ्रेंडली) सजावट स्पर्धा आयोजित केली आहे. या अंतर्गत सजावट पाहण्यासाठी गौऱ्या गणपती महिला मंडळाच्या सदस्यांनी घरोघरी जाऊन भेट दिली. या वेळी महिला मोर्चा उपाध्यक्ष आशा बोरशे व सहकारी उपस्थित होत्या.**



रोमेश गावंड, पिरकोन, उरण



भाजप पाले गावअध्यक्ष अमित म्हात्रे



गिरीश रमेश नाईक, कळंबुसरे



भाजप वासांबे जि. प. विभागीय अध्यक्ष सचिन रामदास तांडेल



केळवणे ग्रा. पं. सदस्य सुशिल ठाकूर

## संपादकीय

# सत्तासम्राटांची पळापळ

भारतीय जनता पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यामध्ये देखील किती शक्ती एकवटू शकते याची झलक सोमवारी कोल्हापुरात बघायला मिळाली. भाजपचे माजी खासदार आणि ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी सत्ताधारी महाविकास आघाडीला यापूर्वीच सळो की पळो करून सोडले आहे. या पळापळीच्या नाटकाचा कळसाध्याय जणू कोल्हापुरात बघायला मिळाला. किरीट सोमय्या यांच्या पाठीमागे हजारो भाजप कार्यकर्त्यांची ताकद एकवटलेली आहे याची जाणीव सत्ताधाऱ्यांना आता तरी झाली असावी, अशी अपेक्षा आहे.

**आधीच घायाळ झालेल्या महाविकास आघाडी सरकारमधील तालेवार नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या ताज्या आरोपांमुळे अस्वस्थ होणे साहजिक आहे कारण सोमय्या यांचे आरोप हवेतील गोळीबाराप्रमाणे नसतात. आरोपांसोबत ते पुराव्याखातर कागदपत्रेही सादर करतात आणि तपास यंत्रणांना अक्षरश: कामाला लागावे लागते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री हसन मुश्रीफ यांच्या विरोधात सोमय्या यांनी रान उठवले आणि कथित १२७ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची हजारो कागदपत्रे ईडीच्या ताब्यात दिली. एवढेच नव्हे तर कोल्हापूरनजीकच्या कागल येथील पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार नोंदवण्यासाठी ते मुलुंडहून निघाले. मुलुंड येथे देखील पोलिसांनी त्यांना अटकाव करण्याचा प्रयत्न केला. अखेर महालक्ष्मी एक्स्प्रेसमधून त्यांना कराड येथे उतरवण्यात आले. गुन्हेगार मोकाट फिरत असून तक्रारदारालाच अटकाव होण्याची ही भारतीय लोकशाहीतील पहिलीच वेळ असावी. विशेष म्हणजे किरीट सोमय्या यांच्यावर झालेल्या पोलिसी कारवाईची गंधवार्तादेखील मुख्यमंत्र्यांना नव्हती असे आता सांगण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यांच्या ताब्यात असलेल्या गृहखात्याने परस्पर ही कारवाई केल्याचे कळते. किरीट सोमय्या यांनी आरोप केलेले मंत्रीमहोदय राष्ट्रवादीचे आणि गृहखातेदेखील राष्ट्रवादीकडेच अशी परिस्थिती असताना तक्रारदाराचे काय होणार हे वेगळे सांगायला नकोच. यानिमित्ताने महाविकास आघाडीतील महाबिघाडी मात्र ढळढळीतपणे जनतेच्या समोर आली. सत्ताधारी आघाडीतील तिन्ही पक्षांमध्ये काहीही आलबेल नाही हेच यावरून लक्षात येते. सोमय्या यांनी केलेल्या आरोपांना हसन मुश्रीफ यांनी उत्तर देण्याचा प्रयत्न केला खरा, परंतु तो दुबळा ठरला. कारण त्यांच्या बाजूने बोलण्यासाठी त्यांच्याच पक्षाचे कोणीही नेते उभे राहिले नाहीत. शिवसेनेने तर हात झटकले आणि काँग्रेसने तर पहिल्यापासूनच मिठाची गुळणी धरली आहे. प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपवर टीका करण्याचा क्षीण प्रयत्न केला, परंतु त्यांच्या टीकेचा रोख कायम केंद्र सरकारकडेच असतो. त्यामुळे हसन मुश्रीफ प्रकरणी, त्यांच्या टीकेची दखल माध्यमांनी फारशी घेतली नाही. गेले काही महिने निरनिराळ्या मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आणि घोटाळ्यांचे आरोप होत आहेत. त्यातील दोन मंत्री तर तुरुंगाच्या दारापर्यंत पोहोचले आहेत. आणखी एक-दोघा मंत्र्यांची अनधिकृत बांधकामे कायद्याच्या कचाट्यात सापडली आहेत. त्यातच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी काँग्रेसच्या दोन मंत्र्यांचे घोटाळे एक-दोन दिवसांत बाहेर काढू, असा सज्जड इशारा दिला आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकाला प्रश्न पडतो की या सरकारमधील सरळमार्गी नेता आहे तरी कुठला? महाविकास आघाडीतील नेत्यांना पैसे कसे खावेत याचेही ज्ञान नसल्याची जळजळीत टीका चंद्रकांत पाटील यांनी केली, ती काही उगाच नव्हे. लोकांचे शिव्याशाप आणि आरोपांचा भडिमार सहन करत हे सरकार आणखी किती काळ टिकाव धरू शकते हे आता बघायचे.**

# अतिवृष्टीबाधित पाणीपुरवठा योजना निधीच्या प्रतीक्षेत



**खबरबात**
**महेश शिंदे**

जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत महाड तालुक्यातील शासकीय मालमत्तेबरोबरच गावागावांतील नळपाणी पुरवठा योजनादेखील बाधित झाल्या. अनेक गावांच्या पाणी योजना पुराच्या पाण्यात वाहून गेल्या, तर विहिरी कोसळण्याच्या घटनादेखील घडल्या. या पाणीपुरवठा योजना, पाण्याचे उद्भव, स्त्रोत आदींच्या दुरुस्तीसाठी स्थानिक प्रशासनाला निधीची गरज आहे.

महाड तालुक्यात जुलै महिन्यात अतिवृष्टी होऊन महापूर आला. यामध्ये रस्ते, शासकीय इमारती, पूल आदी शासकीय मालमत्तेसह गावागावातील नळपाणीपुरवठा योजनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. बहुतांश पाणीपुरवठा योजना या नदीकिनारी असल्याने पुराच्या पाण्याच्या वेगवान प्रवाहात पाईपलाईन उखडून गेली तर काही ठिकाणी पडझड होऊन नुकसान झाले आहे.

महाड तालुक्यातील सुमारे ७२ नळ पाणीपुरवठा योजना तर १४ विहिरी, आणि दोन तलावांचे नुकसान झाल्याचा अहवाल येथील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने वरिष्ठ कार्यालयाला सादर केला आहे. यामध्ये पारमाची, बारसगाव, वरंध, गोठे बुद्रुक, मोहोत, राजेवाडी, भावे, कांबळे तर्फे बिरवाडी, कुंभे शिवथर, कोथुर्डे, नागाव, वाळसुरे, चापगाव, पडवी पठार, आकले, मोहोप्रे, किंजलोळी, काळीज, बिरवाडी, कोंडीवते यांसह अन्य गावातील नळ पाणीपुरवठा योजना, तर रानवडी, वाळण येथील पंपगृह तर कोल आणि नागावमधील विहिरींचा समावेश आहे.



महाडसह परिसरात जवळपास ४.५ हजार मिली पाऊस पडतो. काही दशकांपूर्वी हे मापांक २.५ ते ३ हजार मिमी एवढे होते, मात्र ग्लोबल वॉर्मिंगमुळे बिघडत चालेल्या निसर्गाचा हा परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अतिवृष्टी, ढगफुटी, महापूर, दरडी कोसळण्यासारख्या घटना वाढू लागल्या आहेत. ४.५ हजार मिमी एवढा प्रचंड पाऊस पडूनही महाड तालुक्यातील बहुतांश गावांना आजही एप्रिल, मे महिन्यात पाणीटंचाईला तोंड द्यावे लागते. या गावांना पंचायत समितीकडून टँकरने पाणीपुरवठा केला जातो. या टँकर्ससाठी एवढा भरमसाठ खर्च होतो की त्यातून टंचाईग्रस्त गावांना बिसलरीचे पाणी देता येईल. आजही महाड तालुक्यामधील अनेक गावांतील महिलांच्या डोक्यावरचा हंडा खाली आलेला नाही. तत्कालिक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाडमधील गांधारी नदी पुनर्जीवित प्रकल्प अंतर्गत ठिकठिकाणी कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधल्यामुळे रायगड विभागातली पाणीटंचाई काही काळासाठी कमी झाली होती, मात्र ग्रामपंचायतीच्या नियोजनाअभावी हे बंधारे निरुपयोगी ठरले आहेत.

> **महाडमध्ये आलेल्या महापुरात महाड तालुक्यातील अनेक गावांच्या नळ पाणीपुरवठा योजना, विहिरी आणि तलावांचे नुकसान झाले आहे. त्यामधील काही गावात पर्यायी व्यवस्था करून पाणीपुरवठा सुरू आहे. या योजनांच्या दुरुस्तीसाठी लागणाऱ्या निधीची पूर्तता झाल्यानंतर तत्काळ कामे हातात घेतली जातील.**
> **-श्री. फुलपगार, शाखा अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग महाड**

अनेक गावांतील पाणीयोजना दुरुस्तीअभावी किंवा लाईट बिल न भरल्याने बंद स्थितीत आहेत. एवढे थोडे म्हणून की काय निसर्ग चक्रीवादळ आणि २२ जुलैच्या महाप्रलयात तालुक्यातील अनेक पाणीपुरवठा योजनांचे नुकसान झाले आहे.

महाप्रलयात या योजना बाधित झाल्याने नागरिक सध्या पिण्याच्या पाण्यासाठी अन्य स्त्रोतांचा वापर करीत आहेत. शिवाय पूरग्रस्तांना आलेल्या मदतीमध्ये पिण्याच्या पाण्याचा मोठा साठा असल्याने ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई जाणवली नाही. पावसाळ्यानंतर मात्र पिण्याच्या पाण्याची समस्या जाणवणार आहे. टंचाई काळाच्या आतच या पाणीपुरवठा योजना दुरुस्त होणे गरजेचे आहे. त्याबाबत महाड पाणीपुरवठा विभागाकडून प्रस्ताव सादर केला असून या बाधित योजनांना आता निधीची प्रतीक्षा आहे. या संपूर्ण दुरुस्तीसाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला तब्बल पाच कोटी ४७ लाख रुपयांची गरज असल्याचे प्राथमिक अहवालात म्हटले आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त

# भाजपतर्फे महाडमध्ये ब्लँकेट वाटप



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपतर्फे महाड येथील गोंडाळे आदिवासीवाडीवर ब्लँकेट आणि खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने महाड भाजप मंडळाच्या वतीने तालुक्यातील गोंडाळे आदिवासीवाडीवर ब्लँकेट वाटप करण्यात आले, तसेच तेथील आदिवासी मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, जिल्हा कार्यकारिणी सदस्या डॉ. मंजुशा कुद्रीमोती, महाड तालुका सरचिटणीस महेश शिंदे, निलेश तळवटकर, तुषार महाजन, उपविभागाध्यक्ष राजू पार्टे, वाहतूक सेलचे अध्यक्ष नाना पोरे आदी उपस्थित होते.



(छाया : संजय खांबेटे)

# म्हसळ्यात गणेश विसर्जन

**म्हसळा : प्रतिनिधी**

नऊ दिवस मुक्काम केल्यानंतर रविवारी म्हसळा शहरातील व तालुक्यातील सुमारे ६४० गणपती बाप्पाचे विसर्जन झाले. कोरोनाचे नियम पाळत अनंत चतुर्दशी दिवशी बाप्पांना ढोल ताशांच्या गजरांत व फटाक्यांच्या आतषबाजीत निरोप देण्यात आला.


म्हसळा शहरात वंजारा समाजाचा एकच गणपती सार्वजनिक होता व बहुतांश गणपती खाजगी असल्याने कुटुंबातीत महिला, लहानमोठी मुले मोठ्या संख्येने विसर्जन मिरवणुकीत सहभागी होती. विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक सुर्वे यांनी दोन आधिकारी व २५ कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात केले होते.

# कर्जतमध्ये ११२० गणरायांचे विसर्जन

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात रविवारी (दि. १९) अनंत चतुर्दशीच्या एकूण १११९ गणरायांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. भाविकांनी नदी तसेच गावाजवळ असलेल्या तलाव व ओढ्यांमध्ये गणरायांचे विसर्जन केले.

तालुक्यातील कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आठ सार्वजनिक आणि ४२३ खाजगी, नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ६६३ खाजगी आणि माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील २५ खाजगी अशा एकूण १११९ गणेशमूर्तींचे 'पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात विसर्जन करण्यात आले. कर्जत नगर परिषदतील दहिवली, मुद्रे बुद्रुक, मुद्रे खुर्द, आकुर्ले गावातील भाविकांनी आपापल्या गणेश घाटांकर जाऊन गणरायांचे विसर्जन केले. गुंडगे आणि भिसेगाव येथील भाविकांनी कर्जतमधील गणेश घाटावर येऊन



(छाया : विजय मांडे)

आपल्या गणेशमूर्तींचे विसर्जन केले. अनंत चतुर्दशीच्या आदल्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी विसर्जन करण्यात येणाऱ्या कर्जत पोलीस ठाण्यातील गणरायाचे विसर्जन रविवारी इतर सर्व सार्वजनिक गणरायांच्या आधी करून एक वेगळा पायंडा वरिष्ठ निरीक्षक सुवर्णा पत्की यांनी सुरू केला. त्यांच्यासह सहाय्यक निरीक्षक राजू आल्हाट, संदीपान सोनवणे, सुनीता आथणे, राजेंद्र मांडे, प्रशांत देशमुख आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी ई-पिकपाणी ॲपचा वापर करावा

## मुरूड तहसीलदार गोविंद वाकडे यांचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी या अभियानांतर्गत शासनाने शेतकऱ्यांना आता ई-पिकपाणी ॲप उपलब्ध करून दिले आहे. या ॲपद्वारे शेतकऱ्यांना आपल्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर पिकपाणी नोंद करता येणार आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ई-पिकपाणी ॲपचा वापर करावा, असे आवाहन तहसीलदार गोविंद वाकडे यांनी शनिवारी (दि. १८) केले आहे.

मुरूड तहसील कार्यालयात तालुक्यातील शेतकऱ्यांना ई-पिकपाणी ॲपविषयी माहिती देण्यात आली. त्या वेळी तहसीलदार वाकडे मार्गदर्शन करीत होते. नायब तहसीलदार रवींद्र सानप, मंडळ अधिकारी संजय तवर, तलाठी वरदा मयेकर, तेजस गोयजी यांच्यासह तालुक्यातील शेतकरी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



(छाया : संजय करडे)

पिकपाणी नोंद करण्यासाठी शेतकऱ्यांना अनेकदा तलाठी कार्यालयात हेलपाटे मारावे लागत होते. आता मोबाइल ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आपल्या घरात बसून पिकपाणी नोंद करणे शक्य होणार आहे. या ॲपबाबत संबंधित तलाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षित करणार असल्याची माहिती तहसीलदार वाकडे यांनी या वेळी दिली. दरम्यान, नायब तहसीलदार रवींद्र सानप यांनी शिघ्रे आणि आंबोली येथील शेतावर जाऊन शेतकऱ्यांना या मोबाइल ॲपविषयी माहिती दिली. या वेळी अनेक शेतकऱ्यांनी या ॲपबद्दलची माहिती जाणून घेतली.

# सुधागडात बाप्पांना भावपूर्ण निरोप

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात अनंत चतुर्दशीच्या दिवशी रविवारी (दि. १९) १० दिवसांच्या बाप्पांना साश्रू नयनांनी निरोप देण्यात आला. यंदाही गणेशोत्सववार कोरोनाचे सावट होते. त्यामुळे कोरोना नियमांचे पालन करून गणेशभक्तांनी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशा जयघोषात बाप्पाला निरोप दिला. या वेळी पालीचे पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती.



(छाया : धम्मशील सावंत)

# माणगाव तालुक्यात गणरायाला निरोप

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यात १० दिवसांच्या गणरायाला अनंत चतुर्दशीला रविवारी भावपूर्ण निरोप देण्यात आला. माणगाव तालुक्यात विशेष करून ग्रामीण भागात अनेक गणेशभक्तांनी वाजत, गाजत, नाचत गणरायांची विसर्जन मिरवणूक काढली होती. माणगाव नगरपंचायत हद्दीतील गणेशभक्तांनी वाहनातून व हातगाडीवरून गणराय नेऊन काळ नदी पात्रात विसर्जन केले. गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी काळ नदी पात्रात नगरपंचायतीचे कर्मचारी तैनात होते. या वेळी सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



(छाया : सलीम शेख)

# हे तर पळ काढण्यासाठी बळ वापरणारे सरकार

## भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांचा 'मविआ'वर हल्लाबोल

**अलिबाग : प्रतिनिधी**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांच्या दौऱ्यात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमुळे कायदा सुव्यवस्था स्थिती बिघडेल या भीतीपोटी सोमय्या यांनाच चार भिंतीआड दडवून संकटापासून वाचविण्याची ठाकरे सरकारची युक्ती म्हणजे पळपुटेपणाची परंपरा पुढे चालू ठेवण्याचाच प्रकार आहे. अशा भ्याडपणामुळे राज्यातील भ्रष्टाचारास पाठबळ मिळत आहे, अशी टीका भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांनी केली.

भाजप नेते डॉ. किरीट सोमय्या यांच्या भ्रष्टाचाराविरोधी मोहिमेत संपूर्ण पक्ष त्यांच्यासोबत असून ही लढाई निर्णायक शेवटापर्यंत लढली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालून तो उघडकीस आणणाऱ्यावरच कारवाई करण्याच्या तालिबानी धोरणामुळेच ठाकरे सरकार सर्व आघाड्यांवर सपशेल अपयशी ठरले आहे. केवळ दडपशाही करून अपयश झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न आता सुरू आहे, असेही ते म्हणाले.

कोरोनाच्या संकटास तोंड देण्याऐवजी ठाकरे सरकारने जनतेस घरात बसायवास भाग पाडले. त्यामुळे राज्याच्या आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडाला. शाळांना कुलुपे लावून विद्यार्थ्यांना घरात बंद केले, त्यामुळे शिक्षणाचा बोजवारा उडाला. आता कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे काढण्यासाठी नाकर्ते ठाकरे सरकार सरसावले आहे, हेच सोमय्या यांच्यावरील कारवाईवरून स्पष्ट दिसत आहे, असे ॲड. मोहिते म्हणाले.

या पळपुट्या सरकारमुळे राज्यात आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाली असून अपयश झाकण्याकरिता दडपशाही करणाऱ्या ठाकरे सरकारने स्वतःच्याच कारभारावर प्रश्नचिन्हे निर्माण केली आहेत. धोरण आणि निर्णयाची कोणतीही क्षमता नसल्यामुळेच कोणत्याही प्रश्नावर भूमिका न घेता, प्रश्नच दडपण्याच्या धोरणामुळे ठाकरे सरकारने राज्याच्या जनतेस असुरक्षिततेच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवले असून गुन्हेगारांना मात्र मोकाट सोडले आहे, असा आरोपही मोहितेंनी केला.

राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांना खंडणीप्रकरणी कारवाईचा ससेमिरा चुकविण्यासाठी लपूनछपून वावरावे लागत असून या प्रकरणी पोलिसांचा वापर केल्याच्या आरोपामुळे पोलीस दल बदनाम झाले आहे. देशाच्या सुरक्षिततेला आव्हान असलेल्या अतिरेकी कारवायांचे धागेदोरे मुंबईपर्यंत पोहचल्याचे स्पष्ट होत असताना राज्याचे पोलीस दल मात्र सोमैय्या यांच्यावरील अनैतिक कारवाईसाठी बळ वाया घालवत आहे. राज्यात महिलांवर अत्याचार वाढत असून संजय राठोड नावाच्या मंत्र्यामुळे सरकारची प्रतिष्ठा धुळीस मिळाली आहे. अनिल परब यांच्या भ्रष्टाचाराच्या कहाण्यांमुळे सरकारच्या प्रतिमेचे वाभाडे निघत असताना त्यांनाही पाठीशी घालण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे. हसन मुश्रीफ यांच्या भ्रष्टाचाराची पाळेमुळे उघडी पडली आहेत आणि सरकारमधील अनेक मंत्र्यांवर आरोप होत आहेत. यामुळे अस्वस्थ असलेले पक्षाचे कार्यकर्ते सरकारी पाठबळावर पोलिसांदेखत हाणामाऱ्या करीत असून कायदा सुव्यवस्था स्थिती बिघडवत असताना पोलीस मात्र बघ्याची भूमिका घेत आहेत. अशा घटना रोखण्याऐवजी ज्यांना त्यापासून धोका आहे त्यांनाच ताब्यात घेऊन असे प्रकार रोखण्याची हिंमत नसल्याचीच कबुली ठाकरे सरकार देत आहे, असा आरोपही ॲड. महेश मोहिते यांनी केला.

सुडबुद्धीने कारवाया करून ठाकरे सरकारने राज्यात आणीबाणीहूनही भयानक अशी तालिबानी राजवट सुरू केली असून जनतेच्या मनात संताप खदखदत आहे. सरकारने वेळीच जागे व्हावे आणि गुन्हेगारांना पाठीशी घालण्याऐवजी सत्याला सामोरे जाऊन कारवाईची हिंमत दाखवावी, असेही ते म्हणाले.

# पी. पी. कन्स्ट्रक्शन कंपनीची फसवणूक; गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील पी. पी. कन्स्ट्रक्शन कंपनीची एका भामट्याने १४ लाखांची फसवणूक केली. चौल येथील नवीन प्रोजेक्टसाठी कमी व्याजदरात कर्ज देण्याच्या आमिषाला ही कंपनी बळी पडली. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पी. पी. कन्स्ट्रक्शन या बांधकाम व्यवसाय करणाऱ्या कंपनीला चौल येथे इमारत बांधकाम करावयाचे असल्याने १२ कोटी रुपये रकमेच्या कर्जाची आवश्यकता होती. मे. बॉम्बे फायनान्स इंडिया प्रा. लि. कंपनीचे डायरेक्टर असल्याचे भासवून एका इसमाने पी. पी. कन्स्ट्रक्शन कार्यालयात येऊन कर्जाची ऑफर दिली.

आपल्या फायनान्स कंपनीच्या खात्यामध्ये ४५० कोटी रुपये रक्कम उपलब्ध असून ती पाच टक्के व्याजदराने देऊ, असे त्याने पी. पी. कन्स्ट्रक्शन कंपनीला सांगितले. त्यानंतर १३ जून २०२० रोजी कंपनीच्या अलिबाग येथील कार्यालयात येऊन ॲग्रीमेंटची नोटरी करून कंपनीचा विश्वास संपादन केला. या वेळी प्रोसेसिंग फी म्हणून १२ लाख रुपये व जीएसटी रक्कम म्हणून दोन लाख १६ हजार रुपये असे एकूण १४ लाख १६ हजार रुपये पी. पी. कन्स्ट्रक्शन कंपनीच्या खात्यामधून बॉम्बे फायनान्स इंडीया प्रा. लि. कंपनीच्या ए. यू. स्मॉल फायनान्स बँक शाखा कल्याण पश्चिम येथील खात्यावर पाठवण्यास सांगितले. त्याची पूर्तता करूनही कर्जाची रक्कम देत नाहीत, म्हणून पी. पी. कन्स्ट्रक्शन कंपनीने कर्जप्रकरण रद्द करण्याबाबत आरोपीला पत्र दिले. त्यावर आरोपीने फिर्यादीकडून स्वीकारलेल्या एकूण १४ लाख १६ हजार रुपयांपैकी केवळ १६ हजार रुपये इतकीच रक्कम फिर्यादीच्या खात्यावर परत जमा केली. आपली १४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पी. पी. कंट्रक्शनने अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. अधिक तपास महिला उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

# पंतप्रधान मोदी यांच्या जीवनावर रोह्यात प्रदर्शन

**धाटाव : प्रतिनिधी**



(छाया : जितेंद्र जाधव)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भाजपच्या वतीने सेवा समर्पण अभियान अंतर्गत नवभारत महोत्सव राबविण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून दक्षिण रायगड भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रोह्यातील श्रीकृष्ण हॉलमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींजीच्या संपूर्ण जीवनावर आधारीत प्रदर्शन भरविण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासाठी घेतलेले निर्णय हे कशा पद्धतीने लाभदायी झाले आहेत. संपूर्ण जगभरात त्यांची लोकप्रियता कशा पद्धतीने वाढली गेली, हे या प्रदर्शनात छायाचित्रांच्या माध्यमातून दाखविण्यात आले आहे. या प्रदर्शनला विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेट देऊन पंतप्रधान मोदी यांचा जीवनपट जाणून घेतला. भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग, सरचिटणीस शिवाजी पाटील, चिटणीस प्रशांत सकपाळ, सोशल मीडिया संयोजक राजेश डाके, नरेश कोकरे, पेण तालुका सरचिटणीस महेश बिरगावले, उपसरपंच भरत जाधव, निलेश धुमाळ, राहुल डाके, विलास डाके, अमर वारंगे, श्रीकांत दरडे, रोहित यादव, महिला मोर्चा रोहा तालुका अध्यक्ष जयश्री भांड, सरचिटणीस श्रद्धा घाग, शहर अध्यक्ष ज्योती सनील कुमार, सनिल कुमार पीव्ही, संगीत पाठक आदींसह भाजप कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# म्हसळा तहसीलदारपदी समीर घारे

**म्हसळा : प्रतिनिधी**

येथील तहसीलदार शरद गोसावी हे ३१ ऑगस्ट २०२१ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यामुळे रिक्त झालेल्या म्हसळा तहसीलदार पदावर खेड (जि. रत्नागिरी) येथील अप्पर तहसीलदार समीर घारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. घारे यांनी यापूर्वी रायगड जिल्हाधिकारी कार्यालय, तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण, कणकवली व दापोली, खेड येथे काम केले आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-15/ 21-22/ RFx No. 7000020836 | Work of overhauling for 1 No. 400 kV CB (ABB make) at 400 kV Nagothane s/s under 400 kV R.S (O&M) Division Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel… **2nd call** | **Rs. 13.04** | **27.09.2021 up to 23.59 hrs** |

**EMD** Rs. 1% of Estimate cost & Tender fee Rs. 500/- + GST. For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/** **Contact Person:** Mitesh Goyal, Dy. EE(O) Mob. No. 9461456635 Email ID : **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-Tender Extension notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

**Tender No.:** EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-5/21-22 (RFX No. 7000019661)

**Period for submission of E-Bid:** 20.09.2021 to 27.09.2021 up to 23:59 hrs

**Name of Work: Supply and Erection of Buchholz relay and Gas collecting device for various units of ICTs and TFs at 400kV R.S., Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs) | Tender Fee (Rs) | Closing Date | Technical opening Date | Commercial opening date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. 4,97,647.42 (Including GST) | Rs. 5000/- | Rs.525/- (Including GST) | **27.09.2021 up to 23:59 hrs** | **28.09.2021 at 10:00 hrs (If possible)** | **28.09.2021 at 10:15 hrs (If possible)** |

**Contact Persons:**
1) Mr. A. V. Mahindrakar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 8554995155
2) Ms. P. C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1. Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.
**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**
**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-Tender Extension notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

**Tender No.:** EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-7/21-22 (RFX No. 7000020391)

**Period for submission of E-Bid:** 20.09.2021 to 27.09.2021 up to 23:59 hrs

**Name of Work: AMC for refilling, testing and spares for fire extinguishers at 400kV R.S., Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs) | Tender Fee (Rs) | Closing Date | Technical opening Date | Commercial opening date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. 3,00,000/- (Including GST) | Rs. 5000/- | Rs.525/- (Including GST) | **27.09.2021 up to 23:59 hrs** | **28.09.2021 at 10:00 hrs (If possible)** | **28.09.2021 at 10:15 hrs (If possible)** |

**Contact Persons:**
1) Mr. A. V. Mahindrakar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 8554995155
2) Ms. P. C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1. Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date. **MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**
**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**


# पोलादपुरात खैराच्या लाकडांसह टेम्पो जप्त

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पोलादपूर-महाबळेश्वर मार्गावर खैराच्या सोलीव लाकडांची वाहतूक करणारा एक टेम्पो वनविभागाच्या पथकाने शुक्रवारी रात्री ताब्यात घेतला.

महाबळेश्वरमार्गे कापडे (ता. पोलादपूर) गावापर्यंत एका टेम्पोमधून खैराच्या सोलीव लाकडांची वाहतूक केली जाणार असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर वनविभागाच्या फिरत्या पथकाने पाळत ठेऊन शुक्रवारी रात्री कारवाई केली. यात टाटा ४०७ टेम्पो (एमएच-०४, इएल-२२८८) आणि २.९१६घनमीटर आकारमानाचे तीन लाख ४७ हजार ४७ रुपये किमतीचे खैराच्या लाकडांचे २३१ सोलीव नग जप्त करण्यात आले.

रोहा येथील उपवनसंरक्षक अप्पासाहेब निकत व सहाय्यक वनसंरक्षक विश्वजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनक्षेत्रपाल इच्छात कांबळी, राकेश साहू, अजिंक्य कदम, वनरक्षक पोपट कारंडे, वनपाल श्याम गुजर, नवनाथ मेटकरी, सचिन मेने, मच्छिंद्र देवरे, दिलीप जंगम यांच्या पथकाने ही कारवाई केली.

या प्रकरणी टेम्पो चालक, मालक गजानन यशवंत दिघे व निलेश गंगाराम साळवी (रा. रेपोली, ता. माणगाव), तसेच दीपक महाडिक (रा. दापोली, जि. रत्नागिरी) यांच्यावर वनकायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# सुनेचा छळ केल्याप्रकरणी सासरच्या मंडळींविरोधात पेणमध्ये गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी सासरच्या मंडळींविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पेण चावडीनाका येथील विवाहितेचा १४ फेब्रुवारी २०२० ते १ जुलै २०२१ या कालावधीत पती व सासू वेळोवेळी शिवीगाळी व दमदाटी करून मानसिक व शारीरिक छळ करीत होते, तसेच त्यांनी लग्नात मिळालेले सोन्याचे दागिने स्वतःकडे ठेवले होते. याबाबत पेण पोलीस ठाण्यात पती व सासूविरोधात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास उपनिरीक्षक माधुरी घाडगे करीत आहेत.


**उरण नगरपरिषद**
**निविदा सूचना**

जा.क्र./उनप/बांवि/२२१३/२०२१-२०२२
उरण नगरपरिषद,
उरण, दिनांक :- २०-९-२०२१

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा खाली नमूद केलेल्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रुपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २% रोखीने | ७% बिलातून | | |
| १ | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील बोरी साईनगर येथील श्री. संतोष पवार यांचे घरापासून ते श्री. शंकर मालुसरे यांच्या घरापर्यंत गटाराकरिता आर.सी.सी. पाईप टाकणे. | रु. १,७४,१०४/- | रु. १,७४१/- | रु. ३,४८२/- | रु. १२,१८७/- | रु. ४५ दिवस | रु. ५००/- |
| २ | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील बोरी साईनगर येथील श्री. शंकर ओवळेकर यांचे घरापासून ते श्री. दिगंबर चौगुले यांच्या घरापर्यंत गटाराकरिता आर.सी.सी. पाईप टाकणे. | रु. १,७४,१०४/- | रु. १,७४१/- | रु. ३,४८२/- | रु. १२,१८७/- | रु. ४५ दिवस | रु. ५००/- |
| ३ | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील आनंदनगर-उरण येथील लिबर्टी पार्क इमारतीपासून मुख्य रस्त्यापर्यंत : आर.सी.सी. गटार व रस्ता बांधकाम करणे. | रु. १,२१,९७२/- | रु. १,२२०/- | रु. २,४३९/- | रु. ८,५३८/- | रु. ४० दिवस | रु. ५००/- |
| ४ | उरण नगरपरिषदेच्या कार्यालय इमारतीच्या पाठीमागील सिध्दीविनायक कॉलनी येथील श्री. प्रविण पाटील : यांचे घरापासून ते श्री. संजय चिपळुणकर यांच्या घरापर्यंतचा रस्ता पी.सी.सी. करणे. | रु. १,२६,९५३/- | रु. १,२७०/- | रु. २,५३९/- | रु. ८,८८७/- | रु. ४० दिवस | रु. ५००/- |
| ५ | उरण नगरपरिषदेच्या कार्यालय इमारतीच्या पाठीमागील सिध्दीविनायक कॉलनी येथील श्री. वैवडे यांचे घरापासून ते श्री. दर्णे यांच्या घरापर्यंतचा रस्ता पी.सी.सी. करणे. | रु. १,४७,०३२/- | रु. १,४७०/- | रु. २,९४१/- | रु. १०,२९३/- | रु. ४० दिवस | रु. ५००/- |
| ६ | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील देऊळवाडी-उरण येथील श्री. वाडेकर यांचे घरापासून ते श्री. धुधंर यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. १,३८,०८८/- | रु. १,३८१/- | रु. २,७६१/- | रु. ९,६६४/- | रु. ४० दिवस | रु. ५००/- |
| ७ | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील देऊळवाडी-उरण येथील अष्टविनायक सोसायटी पासून ते व्हिक्टोरिया सलूनपर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. १,३८,०८८/- | रु. १,३८१/- | रु. २,७६१/- | रु. ९,६६४/- | रु. ४० दिवस | रु. ५००/- |
| ८ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील बालई रोड ते गिरी हॉस्पिटलपर्यंत रस्ता दुरुस्त करुन पी.सी.सी. करणे. | रु. १,८०,२१२/- | रु. १,८०२/- | रु. ३,६०४/- | रु. १२,६१५/- | रु. ४५ दिवस | रु. ५००/- |
| ९ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील बालई रोड ते श्रीहरीकृपा इमारतीपर्यंत रस्ता दुरुस्त करुन पी.सी.सी. करणे. | रु. १,८०,२१२/- | रु. १,८०२/- | रु. ३,६०४/- | रु. १२,६१५/- | रु. ४५ दिवस | रु. ५००/- |
| १० | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील मशिद मोहल्ला येथील मशिदीपासून ते श्री. साहिल ठाकूर यांचे घरापर्यत आर.सी.सी. रस्ता करणे. | रु. १,५३,२६७/- | रु. १,५३३/- | रु. ३,०६५/- | रु. १०,७२९/- | रु. ४० दिवस | रु. ५००/- |
| ११ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील बोरी-उरण येथील श्रीम. गिता मयेकर ते श्री. दिलीप टाकळे यांचे घरापर्यंत नाला दुर करणे. | रु. १,७८,२२७/- | रु. १,७८२/- | रु. ३,५६५/- | रु. १२,४७६/- | रु. ४५ दिवस | रु. ५००/- |
| १२ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील मशिद मोहल्ला येथील मशिदीपासून ते श्री.अझगर भाईजी यांचे घरापासून ते वासिम मुकरी यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. रस्ता करणे. | रु. १,५०,९०९/- | रु. १,५१०/- | रु. ३,०१८/- | रु. १०,५६७/- | रु. ४० दिवस | रु. ५००/- |
| १३ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील सातरहाटी येथील गटारावर लोखंडी चेंबरचे बांधकाम करणे. | रु. १६,५६७/- | रु. १६६/- | रु. ३३१/- | रु. १,१६०/- | रु. २५ दिवस | रु. १००/- |

अटी/शर्ती :

(१) **इसारा रक्कम :-** कामाची इसारा रक्कम धनाकर्ष/रोखीने नगरपरिषदेच्या लेखा विभागात दिनांक २१/०९/२०२१ ते २८/०९/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत भरणेची आहे. जे ठेकेदार इसारा रक्कम भरणा करणार नाहीत अशा ठेकेदारांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(२) **कोरे निविदा नमुने विक्री :-** कोऱ्या निविदांचे नमुने नगरपरिषदेच्या लेखा विभागात निविदा शुल्क (न परतीचे) रोखीने भरणा केल्यास दिनांक २१/०९/२०२१ ते २८/०९/२०२१ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागातून उपलब्ध होतील. निविदा नमुने कोणत्याही परिस्थितीत पोस्टाने पाठविले जाणार नाहीत.

(३) **निविदा सादर करणे :-** निविदा सादर करताना द्विलखोटा पद्धतीने दोन स्वतंत्र लखोट्यात पुढीलप्रमाणे सादर करणेच्या आहेत.

I) **लखोटा क्र. १ :-** (तांत्रिक बोली) सदर लखोट्यावर स्पष्टपणे दिसेल असे ''लखोटा क्र. १'' नमूद करणेचे असून सदर लखोट्यात इसारा रक्कम धनाकर्षाद्वारे/रोखीने भरल्याची मूळ पावती व इतर कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

II) **लखोटा क्र. २ :-** (वित्तीय बोली) सदर लखोट्यावर ''लखोटा क्र. २'' असे स्पष्टपणे नमूद करणेचे असून त्यामध्ये नगरपरिषदेने पुरविलेली अधिकृत नमुन्यातील पूर्णपणे भरलेली कोणत्याही अटी/शर्ती व खाडाखोड नसलेली निविदा सादर करणेची आहे.

(४) लखोटा क्र. १ व २ सिलबंद करून तिसऱ्या लखोट्यात एकत्रितपणे भरून त्यावर कामाचे नांव, कंत्राटदाराचे नांव व पत्ता इत्यादी नमूद करून मुख्याधिकारी उरण नगरपरिषद यांचे नांवे दिनांक ३०/०९/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत नगरपरिषदेच्या आवक/जावक विभागात सिलबंद निविदा सादर करणेच्या आहेत. विहित मुदतीनंतर आलेल्या निविदा कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत.

(५) प्राप्त झालेल्या निविदांपैकी लखोटा क्र. १ (तांत्रिक बोलीचा लिफाफा) दिनांक ३०/०९/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता उपस्थित ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधींसमोर निविदा समिती सदस्य यांचेकडून बांधकाम विभागात उघडण्यात येईल. तांत्रिक बोली लिफाफ्यातील कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणाऱ्या ठेकेदारांच्या वित्तीय बोलीचा लिफाफा (लखोटा क्र. २) दोन दिवसांनंतर निविदा समितीने निश्चित केलेल्या वेळेवर निश्चित केलेल्या ठिकाणी उपस्थित ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधींसमोर उघडण्यात येईल.

(६) कोणतीही एक अथवा सर्वच्या सर्व निविदा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

(७) ठेकेदाराने नगरपरिषदेमध्ये इसारा रक्कम भरणा केल्यानंतर कोणत्याही कामाची निविदा नगरपरिषदेकडे दाखल न केल्यास इसारा रक्कम परत मिळणार नाही.

(८) निविदा सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर अथवा निविदा स्विकृतीनंतर निविदेतील तपशीलात आवश्यकता वाटल्यास फेरफार, कमी/जास्त करणेचा अधिकार नगरपरिषदेस राहील.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
उरण नगर परिषद

